# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दूरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल: cetcell@mahacet.org

क्रमांक : आस्था-१९२५/प्र.क्र.२९/पद भरती/सेवानिवृत्त कंत्राटी/परिक्षा समन्वयक व सहाय्यक परिक्षा समन्वयक/ अवर सचिव, कक्ष अधिकारी 2472 /२०२५ दिनांक : 30 JUL 2025

### जाहीर नोटीस

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेचे काम करण्यासाठी कार्यालयातील कामकाजाच्या अनुषंगाने खालील कामाकरिता कंत्राटी पध्दतीने काम करण्यासाठी सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांमधून शासन विहित अटी-शर्तीनुसार खालील कामासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत,-

| अ. क्र. | पद | पदाची संख्या | पात्रता |
|---|---|---|---|
| १) | अवर सचिव | संख्या (एक) | समकक्ष पदावरुन सेवानिवृत्त झालेले असावेत. |
| २) | कक्ष अधिकारी | संख्या (दोन) | |
| ३) | परिक्षा समन्वयक | संख्या (दोन) | १) अर्ज करणारे अधिकारी शासन सेवेतून (गट-अ/गट-ब) राजपत्रित पदावरुन निवृत्त झालेले असावेत.<br>२) परीक्षा समन्वयक हे उपसंचालक पदापेक्षा जास्त दर्जाच्या पदावरुन सेवा निवृत्त झालेले असावेत आणि सहाय्यक परीक्षा समन्वयक हे सहाय्यक संचालक पदापेक्षा जास्त दर्जाच्या पदावरुन सेवा निवृत्त झालेले असावेत.<br>३) सेवानिवृत्त होताना किंवा झाल्यावर त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी/न्यायिक कार्यवाही प्रलंबित नसावी.<br>४) जाहिरातीच्या दिनांकास अर्जदाराचे वय ७० वर्षापेक्षा अधिक नसावे.<br>५) व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा व प्रवेश प्रक्रियेची माहिती असल्यास प्राधान्य. |
| ४) | सहाय्यक परिक्षा समन्वयक | संख्या (चार) | |

अटी व शर्ती,-

१) इच्छुक व आवश्यक अर्हता धारण असणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरीता **दिनांक ३० ऑगस्ट २०२५** पर्यंत सीईटी कक्षाच्या www.mahacet.org या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यात अर्ज (विवरणपत्रासह) cetcell@mahacet.org या ई-मेल पत्त्यावर पाठवावा.

२) सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना निवृत्तीच्या वेळी मिळालेल्या अंतिम वेतनातून निवृत्तीवेतन वजा करुन ठोक रक्कम देय असेल. तसेच प्राधिकरणामार्फत वेळोवेळी ठरविण्यात येणाऱ्या प्रोत्साहनपर रक्कम दिले जाईल.

३) प्राप्त झालेल्या अर्जांची आवश्यक ती पडताळणी करुन उमेदवाराची मुलाखत घेण्यात येईल तसेच उमेदवारांना मुलाखतीकरीता कोणताही प्रवासभत्ता देय राहणार नाही. उमेदवार निवडीबाबतचा अंतिम अधिकार प्रवेश नियामक प्राधिकरणाचा राहील.

४) वरील नियुक्त्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व सुरुवातीला केवळ ११ महिन्याच्या कालावधीसाठी मर्यादित राहील.

५) उमेदवाराचे कामकाज कोणत्यावेळी असमाधानकारक आढळल्यास सदस्य सचिव यांच्या अनुमतीने एक महिन्याची पुर्व सूचना देऊन सेवा समाप्त करण्यात येईल.

६) अधिक माहितीसाठी: ०२२-२२०१६१५३ /५७/५९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
सदस्य सचिव
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई.

स्थळ : मुंबई.

## अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त राज्य शासकीय कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज.

अर्जदाराने अलीकडील काळातील स्वत :चे छायाचित्र येथे चिकटवावे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराचे संपूर्ण नाव | : | ------------------------------------------------ |
| २) | जन्म दिनांक व वय | | ----/----/------ |
| ३) | सेवानिवृत्त दिनांक | | ----/----/------ |
| ४) | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | | ------------------------------------------------ |
| ५) | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाचे ग्रेड वेतन सातव्या/ वेतन आयोगानुसार वेतनस्तर | | ------------------------------------------------ |
| ६) | सेवानिवृत्ती वेळेस कार्यरत असलेल्या विभागाचे नाव | | ------------------------------------------------ |
| ७) | संबंधित प्रशासकीय विभाग | | ------------------------------------------------ |
| ८) | अर्जदाराचा पत्ता | : | ------------------------------------------------ |
| ९) | भ्रमणध्वनी क्रमांक | : | ------------------------------------------------ |
| १०) | ईमेल | : | ------------------------------------------------ |
| ११) | सेवेत असताना शिक्षा झालेली आहे का | : | ----/----/------ |
| १२) | आवश्यक असलेली अर्हता अर्जदारास आहे काय? | : | होय / नाही |
| १३) | अनुभव | : | ------------------------------------------------ |

महाराष्ट्र अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियम) अधिनियम २०१५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षात निव्वळ कंत्राटी तत्वावर सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी अवर सचिव, कक्ष अधिकारी, परीक्षा समन्वयक, सहाय्यक परिक्षा समन्वयक या पदाकरिता प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील /सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची स्वाक्षरी

सहपत्रे : सर्व आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे

(टिप : उपरोक्त नमूद माहिती आवश्यक असल्याने संपूर्ण माहिती सादर करणे अनिवार्य आहे.)